1141

1141
COḶKAR (Gopāḷ Kṛṣṇa)
Sameṭācā pūrvārdha povāḍā.

Akolā: G.K. Colakara, 1931.
10 p. 18 cm.
Nationalistic ballad, including praise of Bhagat Singh and his comrades.
PIB 162/11

P.I.B. 162/11

॥ वंदेमातरम् ॥



समेटाचा पूर्वार्ध

पोवाडा

COLKAR (Gopal Krsna)

लेखक व प्रकाशक—

शाहीर-गोपाळ कृष्ण चोळकर, अकोला-वऱ्हाड.

मुद्रक—द. स. अभ्यंकर,
राजस्थान प्रिंटिंग अँड लिथो वर्क्स लि. अकोला.

प्रथमावृत्ति २०००
किंमत २ आणे.
१० सप्टेंबर १९३१

[illegible]
26/10

प्रस्तावना.

येथील प्रसिद्ध **शाहीर गोपाल कृष्ण चोळकर** यांनीं लिहिलेल्या पोवाड्यास मी प्रस्तावना लिहावी ह्मणून तो पोवाडा मजकडे पाठविलेला आहे. काँग्रेसच्या कायदेभंगाच्या चळवळींत गोपाळकृष्ण यांनीं सर्व वऱ्हाडभर हिंडून आपल्या पोवाड्यांनीं विलक्षण लोकजागृति केली. त्यांचा " रणगर्जना " नांवाचा पोवाडा सर्व वऱ्हाडांतील लोकांच्या परिचयाचा आहे. यांच्या पोवाड्याचा सरकारवरही बराच परिणाम झालेला दिसतो. कारण श्री. गोपाळकृष्णांचा " रणगर्जना " पोवाडा सरकारनें जप्त केला व त्या पोवाड्याबद्दल श्री. गोपाळकृष्णास सरकारचा पाहुणचारही (कारावास) भोगावा लागला. श्री. गोपाळकृष्णांनीं नवीन लिहिलेला पोवाडा " **समेटाचा पूर्वार्ध** " उद्बोधक व स्फूर्तिदायक आहे कायदेभंगाच्या चळवळीनंतर जी गांधी-इर्विन तडजोड झाली ती हिंदुस्थानांतील नोकरशाहीला पसंत नसल्यामुळें ती तडजोड काँग्रेसकडून मान्य केली जाऊ नये ह्मणून मुद्दाम कराचीस काँग्रेस भरणाऱ्या आधीं थोडे दिवस अगोदर सरदार भगतसिंगास व इतर दोन इसमास फांशी देऊन हिंदुस्थानांतील बहुजन समाजाचें मन नोकरशाहीनें दुखविलें. असें झालें असतां काँग्रेस गांधी-इर्विन तडजोड धुडकावून लावील अशी नोकरशाहीची अपेक्षा होती. परंतु ती सफल झाली नाहीं. कारण काँग्रेसच्या अनत्याचारी चळवळीचा क्रांतिकारकांच्या चळवळीशीं कांहीं संबंध नव्हता. काँग्रेस गांधी इर्विन तडजोड मोडीत नाहीं हें पाहून नोकरशाहीनें ठिकठिकाणीं तडजोडीच्या अटींचा भंग करण्यास सुरवात केली व त्याचा परिणाम असा झाला कीं काँग्रेसनें गोलमेज परिषदेंत भाग घेण्याचें नाकारलें. परंतु नोकरशाहीनें पुनः पडतें घेतल्यामुळें गांधी इर्विन तडजोड पुन्हां अमलांत असून काँग्रेसतर्फे म. गांधी गोलमेज परिषदेकरितां गेले आहेत. या गोष्टीचें रसभरीत वर्णन या पोवाड्यांत श्री. गोपाळकृष्णानीं आपल्या अनुकरणीय भाषेनें केलें आहे.

पोवाड्यांत प्रस्तावना लिहिण्याची चाल नाहीं. तथापि मी चार शब्द लिहिले आहेत. पूर्वींच्या पोवाड्याप्रमाणें हाही पोवाडा लोकांचीं मनें आकर्षित करील अशी माझी खात्री आहे.

अकोला
ता० [illegible]-९-३१

पुरुषोत्तम बळवंत गोळे.

—॥ श्री ॥—

समेटाचा पूर्वार्ध

पोवाडा.

(चालः—डफाचे पोवाड्याची.)

किरण १ लें.

। साष्टांग प्रणाति सद्भावें। करितसा धांवे। विघ्न हरणा ये गजवदना। स्फूर्ती दे बालकांस कवना॥ तूं दाता रिद्धीसिद्धीचा। चारि मुक्तिचा। आरंभी दे यश कार्यांशी। हेची वरदान देयि शिशुसी॥ वाग्देवि सरस्वति येई। अती लवलाही। अभय वरदान देई मजला। पातलो दीन शरण तुजला॥ सद्भाव सद्गुरु नमीं। असें दीन मी। पहा त्वद्बुद्धि हीन दास। तुझीया कृपेची धरि आस॥ ज्यांचिया सत्य सत्पुण्यें। शुद्ध वर्तनें। कृपेनें हे दिन मी बघतों। ते मम जनक जननी नमितो॥ घनदाट सभा पाहुन। करितो वंदन। बुद्धिमान बंधु भगिनीला। शिशुच्या ऐका कवनाला॥ सुशिक्षित आणि अशिक्षित। यांस निभ्रांत। कळावा पोवाडा त्यांना। मराठी भाषेत केली रचना॥ नाहिं ज्ञान मला भाषेचें। काव्य नियमाचें। सूज्ञ तुम्ही क्षमा करा दोष। घ्यावा रस नका बघूं ऊस॥ अता तुम्हीं ऐका रिपोर्टर। भाषा पेंटर। खात्या घर्चे वासे मोजणारे। रिपोर्ट लिहा इमाने इतबारे॥ जुलिम कायदेभंग जोरदार। प्रखर बहिष्कार। लोळवी धुंद इंग्रजाला। समेट करुन प्राण वाचविला॥ धृ.॥ सत्याग्रह रण आहलें। वर्ष लोटलें। निर्णय युद्धांचा काय झाला। स्वस्थ चित्तानि ऐका सगळा॥ ज्यावेळीं रणभूवरी। गर्जल्या भेरी। युद्ध बघुन नवल वाटे फार। होता निःशस्त्र प्रतिकार॥ रक्तपात झाल्या वाचोनी। आजवर कोणी।

मिळवु शकले न राज्य कांहीं । असा इतिहास देतो ग्वाही ॥ परि अजब युद्ध बघितलें । थक्क जग झालें । उपसली नाहीं एकही समशेर । शत्रु केला जागच्या जागीं गार ॥ पाहूतां दोन्हीं पक्षांस । नवल गमे खास । दोघांचे गुण शक्ती तुलीतां । दिसतो छत्तिसांचा आंख पुरता ॥ एक तो अहिंसावादि । एक हिंसावादि । एक अति क्रूर अत्याचारी । सहनशील एक शांत भारी ॥ एक दरिद्री नारायण । कुबेर एक जाण । एकिकडे विरोधी गुणशक्ती । एकिकडे अचाटबल युक्ति ॥ एकीकडे ब्रिटीश सरकार । जबरदस्त फार युद्ध सामुग्री कडेकोट । ज्याची चाले हवेत आगबोट ॥ एक छत्र दीडशे वर्ष । ज्याचा उत्कर्ष । काडीभर नाहीं कमी झाला । त्याची घमेंड होती सरकाराला ॥ शक्ति शस्त्र अस्त्र संभार । ज्याचा जोरदार । असा जर्मनी लोळवला । मग कॉंग्रेसचा केवा कुठला ॥ अशा धुंदित होता मगरमस्त । देश केले फस्त । स्वर्ग ज्याला दोन बोट उरला । भेटण्याला त्याला गांधी गेला ॥ फेब्रुवारी १९३० । बावीस तारखेस । बजावी गांधी सरकाराला । विचार करून द्यावे उत्तराला ॥ आपलाले हक्क भारतास । मागे कॉंग्रेस । द्यावे ते तुम्ही बऱ्या बोला । शहाणपणा यातची तुम्हाला ॥ नाहीतरी सत्याग्रह खास । करिल कॉंग्रेस । भंग करिल जुलमी कायद्याचा । स्विकारुनि मार्ग अहिंसेचा ॥ मस्तीमध्यें दिले उत्तर । करून धीःकार । लाथाडिले गांधी मागणीला । पाहिला नव्हता गांधींचा टोला ॥ साम आणि दामानीं जेव्हां । ऐकेना तेव्हां । दंडाचा उपाय जो तिसरा । कॉंग्रेसनीं त्याचा केला आसरा ॥ सविनय कायदेभंगाची । चळवळ करण्याची । कॉंग्रेसनीं आज्ञा जारी केली । कायदेभंग चळवळ सुरुं झाली ॥ कायदेभंग मिठाचा केला । दांडी गांवाला । गांधीनं एप्रिल साहाला । साल १९३० ला ॥ समुद्राचं गोळा करून मीठ । गांधी महा धीट । नाक चिरून मीठ केव्हां भग्न । नाचे गोरा पिशाच्च जणु शिरल ॥ पेटविल्या ज्वाळा अग्निच्या । कायदेभंगाच्या । जाळीतां जुलमी कायद्याला । बंबाळा भारतात उठला ॥ भडकली चहूंकडे आग । सुचेना मार्ग । मूर्ख हा आग विझवु गेला । पाण्या ऐवजी टाकी तेला ॥ जुलमी कायदे

असुन भाराभर । आणिक घाली भर । काढूनी बहुत आर्डिनन्स् ! मारु गेला कृष्णाला कंस ॥ कायदेभंग चळवळ जोरात । होती भारतात । मीठाचा, जंगल कायदेभंग । त्यांनें केली नोकरशाही तंग ॥ साठ सत्तर हजारावर लोक । राव आणि रंक । सत्याग्रही कॉंग्रेस कार्यकर्ते । सर्व मोठमोठे जेलांत होते ॥ बहिष्कार होता जोरदार । ब्रिटीश मालावर । त्यामुळें धाबे दणाणिलें । धान्याचे पांढरे झाले डोळे लॅंकेशायर मधील बहु गिरण्या । लागल्या बोंब माराया । छातिवरिल उठवा बहिष्कार । मरतो आह्मी होवुन उपासमार ॥ इंग्लंडची ऐकुनि ललकार । शहाणे भराभर । धावले घेवुन बंदुक, लाठी बर्च्या । पाडु गेले मुर्दा चळवळीचा ॥ विड घहाणे करु गेले काय । जाहले वरती पाय । तोडीता वृक्ष वाढे जैसा । चळवळीस जोर चढे तैसा ॥ कॉंग्रेस शस्त्र बहिष्कार । करित भडिमार । भारतांतून इंग्लंडाला । मरण वा शरण मार्ग उरला ॥ इंग्लंडची बहुत ट्रेझरी । खाली झाली सारी । दैवि आली होति नादारी । वाढली होति अतिशय बेकारी ॥ सल्लागार मंडळ सरकारचे । ह्मणति गोऱ्यांचे । चळवळ ही शांत झाल्याविण । मुष्कील आहे आपणांस जिते रहाण ॥ चळवळीचे भूत मानेवलें । उठावे ह्मणुन सगळे । करुं नये उपाय ते केलें । उलट ते भुत जास्त भडकुन गेले ॥ लाठी चार्ज करुन पाहीला । अमानुष हल्ला । अखेर गोळीबारहि तो केला । परी उलट जोर चळवळीला ॥ लष्करी कायदाहि केला । मॉरशल्ला झाला । परी बालाग्र न, की लवले । राक्षसी उपाय मात्र हरले ॥ गुन्हा केला किंवा नच झाला । नाहीं पाहिला । वाटेल त्यास जेलांत दडपिलें । उलट हजारानीं लोक गेलें ॥ गांधीच्या नेत्र संकेतास । लाखो माणूस । पटापट अग्नींत उड्या घेती । पाहून गोरा ठोकी अपुली छाती ॥ काय अपली गती यापुढे । पडले होते कोडे । शरण कॉंग्रेसला गेल्याविण । कोण राखिल जगांत दुजा प्राण ॥ याधीण तोड दुजि कांहीं । शिल्लक उरली नाहीं । कॉंग्रेस शद्बाचा होता मान । सत्तेचे पेंक न टुनटुण ॥ भारतात रहावे जिते ह्मणुन । दाति तृण धरुन । नाक मुठित धरुन शरण आला । वाचवा ह्मणं गांधीजीला ॥ करा

त्यान तीव्र समशेर । प्रखर बहिष्कार । कायदेभंग चळवळ त्याचे मागें । काँग्रेस त्याकरितां अटी सांगे ॥ जितुकि गावें अस्तिल लहान मोठी । समुद्राचे काठीं । मीठ करु त्या त्या गावाला । रद्द करा मिठाचे कायद्याला ॥ चळवळीतील नोकर सरकारी । केले असल्यास दुरी । ज्याची इच्छा असल्यास जागा त्याची । अर्ज घेऊन द्यावी त्यांस त्यांची ॥ शेतसारा राहिला जो अजून । भरतील तो आणुन । वसुल नच करणें जुलमानी । भरु नये कर्ज करुनी कोणी ॥ राजबंदी अनत्याचारी मंडळी सारी त्यांना विनशर्त सोडुन देणें । त्यांचा नच दंड वसुल करणें ॥ जंगम आणि स्थावर इस्टेट । केलेली जप्त । ताब्यांत असलेली द्यावी परत । इत्यादी अटी होत्या त्यांत ॥

काँग्रेस सांगे तेव्हां सरकाराला। अशा अटी आम्ही अपूल्या कथिल्या॥
अटींत जरी पालन झाल्या । तरी आम्ही रोखूं चळवळीला ॥
आड विहिर झाली सरकारला । अखेर व्हाईसरॉय कबुल झाला ॥
तेव्हां तहनामा तयार केला । तारिख ५ मार्च ३१ साला ॥

ध्रुव:-गांधी आणि लार्ड इर्वीन । अशा सभा होऊन । जाहिर हे केले जनतेला । गांधी-इर्वीन समेट झाला ॥ १ ॥ जु० का०

किरण २ रं.

शांतता नांदावी म्हणुन । आणला घडवून । केला तह थोर प्रयत्नानी । तेव्हांच्या व्हॉइसरायांनी ॥ खंबीर मनाचा थोर । सच्चा दिलदार । व्हॉइसराय इर्विन होता म्हणुन । नातरी समेट होणें कठिण ॥ समेटाचे पालन करण्यास । जबाबदार खास । काँग्रेसच्याहुन अधिक थोर । गव्हर्मेंट होते जबाबदार ॥ काँग्रेसवराती फक्त जबाबदारी । होती ही सारी । कायदेभंग चळवळ रोकण्याची । ती तिनें पार पाडली साची ॥ गव्हर्मेंटचे समेट पालन । चालले कसे अजुन । कळेल ते येणार आहे पुढती । सर्पापरी समजा त्याची वृत्ती ॥ ऑल इंडिया काँग्रेस । भरणार कराचीस । म्हणुन त्याची तारिख ठरली इकडे । नोकरशाही काय करी तिकडे ॥ पेन काँग्रेसच्या मुहुर्तास । काँग्रेस पेक्ष्यास । घेतला चावा कडकडुनी । गोऱ्याच्या काळ्या सर्पांनी ॥ अनत्याचारी काँग्रेस । आहे हे खास । पूर्णपण

समजूत होती हृदयीं। त्याचा फायदा घेत नोकरशाही॥ भगतसिंगनें केलेलें कृत्य । अत्याचारी सत्य । मार्ग कॉंग्रेस मान्य नव्हता । परी एक वर्ग ऐसा होता ॥ भगतसिंगाच्या देशभक्तिच्या । तच्चरित्राचा । गौरव करणारा वर्ग त्यांत । होता निःसंशय भारतात ॥ तो वर्ग कॉंग्रेसविरुद्ध । जाण्यास झाल्या सिद्ध । तरी दुही माजेल आपोआप । पाहुण्या हातुन माली जाईल साप ॥ बायचान्स होईल हे जरी । माजेल दुही भारी । कॉंग्रेसचा फिक्का पडेल रंग । कल्पनेंत नोकरशाही दंग ॥ आणि ह्याच कल्पनेवर । रचला डाव थोर । डाव तो आपणा कळण्यास । थोडक्यांत पाहू इतिहास ॥ समेट झाला होता नुकताच । सुमारास त्याच । राजबंदी सुटले होते पाही । सुटायचे राहिले होते कांहीं ॥ उरल्यापैकीं कांहीं राजबंदी । भगतसिंगादी । गांधी ह्मणे तेही सुटतील । परंतु पाहिजे थोडा काल ॥ गांधींच्या असल्या वाक्याला । स्वाभाविक जाण । समजुत लोकांची झाली ऐसी । निदान भगताची चुकेल फासी ॥ असली होती जगाची आस । परी भगतास । फासी देण्याचा हट्ट धरला । ऐकुनी भारत कळवळला ॥ भगतसिंग शूर सरदार । होता बाणेदार । अतुल ज्यान आत्मयज्ञ केला । गेला परि कीर्ति रूपे उरला ॥ असेंब्लित बॉंब टाकले त्यानी । ह्या गुन्हा वरूनी । काळ्या पाण्याची शिक्षा दिधली । यामध्यें फाशी नव्हती झाली ॥ काळ्या पाण्यात जिता राहता । पुढें सुटुनी येता । परी देवाचा पडला घाला । अमृतात विषबिंदू पडला॥ देहात दंड ज्यात झाला । भगतसिंगाला । खटला त्यावरती दुसरी केला । 'लाहोरकट' ह्मणुनी ह्मणती ज्याला ॥ कोर्टात आरोपी येतिना । सांगुनी नाना । त्यांचे मागे चालेना केस । आड विहिर झाली सरकारास ॥ जेलात वागवित होते अन्यायान । त्यांना जुलुमाल । सहन नच झाले जितेंद्राला । अन्न त्याग त्यानी सुरू केला ॥ आखेर दिवस बासष्ट । भोगुनि कष्ट । हुतात्मा जितेंद्र बळी पडला । २३-१२-२९ ला । तिन महिने सतत अन्नत्याग । करून भगतसिंग । नलला असाह्य शक्तिहीना । ह्मणुनी कोर्टात जावु शकेना । या वर्ति तोड काढि ती । कुटिल राजनिती । अन्नत्याग गुन्हा ठरविणारे

'हंगर स्ट्राइक' बिल काढले दुसरे ॥ अन्यायी बिल काढून । व्हॉइसरायान । मॅजिस्ट्रेटास हुकुम दिधला । आरोपीमागे चालवा खटला ॥ लोक लज्जा कांहीं तरि होति । नोकरशाही प्रती । परी व्हॉइसरायेच हुकुमानी । नोकरशाही गेलि आनंदोनी ॥ आधिच मारुडाची जाति । धुंद मद्यात । इतुक्यामदें विंचु त्यास डसला । त्यामध्यें भुतानि झडपियला ॥ मग चेष्टा कोण वर्णील । तेव्हां तात्काळ । ट्रिब्युनल नेमले गेले सांचे । मॅजिस्ट्रेट तिन हायकोर्टाचे ॥ स्पेशल हुकुम ऑर्डिनन्साचें । सत्र दिले साचे । स्पेशल ट्रिब्युनलचे हातात । आदा एक कलम घालुनी त्यात ॥ ट्रिब्युनलचे पुढही खास । चालणार केस । इथे जो निर्णय होईल कांहीं । अपिल त्या वरी चालणार नाहीं ॥ अशी क्रूर कलमं घालुनी । आड विहीर करुनी । न्याय देण्यास सिद्ध झाला । आरोपिंस पोलीस आणू गेला ॥ भगतसिंग करुन धिःकार । देत उत्तर। हम नाहीं आते चले जाना ॥ लेकिन ये लफ्जहि कह देना ॥ पोटभरू असल्या कोर्टांत । न्याय नच होत । मानवी निर्मित कोर्टही ॥ यांना मी कोर्ट मानित नाहीं ॥ काय निर्णय द्यावा आम्हास । ठरवून आधि खास । नंतर ही कोर्टे जिथे बसली । न्यायाची थट्टा आरंभिली ॥ नच ठावे धर्म निति काय-। दया आणि न्याय । शब्द हे ज्यांचे कोशांत नाहीं । तिथे दुजी आस व्यर्थ पाही ॥ अस्लि परिस्थिती जोवरी-। सत्य तोवरी । दयेची भीक न मागे मी । मृत्यूसी भित नाहीं आम्ही ॥ करणारा राज कारण-। असो कुणीजाण । त्याने खरें कार्य करित रहावे । न्यायासन कायदे नच पहावे ॥ आमचा न्याय होईल निभ्रांत-। ईश्वरा दयामांत । मॅजिस्ट्रेट शरमिंदे फार । ताकाचे वगारू जाणु दुसरं फितुर होऊन बंधुला कापि-। अस्ली ही कुणी । जजमेंट काय देणार जाणतो मी । डिफेन्स म्हणून देत नाहीं आम्ही ॥ पोलिस गेला खालच्या मानेन-। उत्तर ऐकून । भगतसिंगादी आरोपी ते । कोर्टामधे कुणी हजर नव्हते ॥ त्याचे मागे लाहोरकट केस-। झाली सुरु खास । शेकडो सरकारतर्फे साक्षी । झाल्या त्या सर्व एक पक्षी ॥ उभ्या हिंदुस्थानाचे लक्ष--। वेधणारी खास । असल्यापरि कसे

असुन भारी । परी एक तर्फि झाली सारी ॥ अखेर स्पेशल ट्रिब्यूनलनी । जजमेंट खरडोनी । भयंकर निकाल तो--दिधला । सात आक्टोबर तीसाला ॥

चालः—सँडर्सचा खून केला यांनीं । बँक लुटण्याचा डाव करुनी ॥
भयंकर बाँब तयार करूनी । असेंब्लीमध्यें टाकले नेवूनी ॥
सायमन कमिशनची ट्रेन यानी । खटपट केली पाडावि ती ह्मणुनी ॥
इत्यादि गुन्हे केले ह्मणुनी । समजून करून घेऊन मॅजिस्ट्रेटनीं ॥

टीपः—सुखदेव राजगुरु शूर । भगत सरदार । दोषि करून या त्रैमूर्तिला । फाशि द्या यांना जज्ज वदला ॥ २ ॥ जु० का०

किरण ३ रें.

फाशीची शिक्षा भयंकर । येता कानावर । उभे भारत हदरुनी गेले । लहान, थोर, राव, रंक सगळे ॥ फाशि बदलून व्हावे काळे पाणी । ह्मणून भारतानी । खटपटिची सिमा सर्व केली । परी नच फलद्रुप झाली ॥ लाखोगणती सह्या घेवुन । धाडला लिहून । दयेचा अर्ज व्हॉइसरॉया । छाति दगडाची नये माया ॥ फेटाळिला अर्ज व्हॉईसरॉयन । मस्तीमधें चढुन । धरुनि मनि असुरी वृत्तिला । केले सोलापुरच्या आवृत्तीला ॥ महावैद्य महात्मा गांधी । गुंतला होता युद्धी । समेट करून नुकताच बाहेर पडला । फिरुन याबाबत भेटण्यास गेला ॥ परोपरी सांगुनी नाना । ईर्विन ऐकेना । विन्मुख होऊनी बाहेर पडले । द्वाराबाहेर गांधी काय वदले ॥ अर्पून माझे जीवित । वाचता जरि भगत । तरि मी प्राण दिले असते । गांधिचे उद्गार ऐसे होते ॥ अशापरि सर्व बाजुन । आटोकाटान । केलि शिकस्त प्रयत्नाची । वाढ नच खुंटे रोगाची ॥ अठामार वनस्पति आणि । मात्रा बहुगुणा । हेमगर्भादि मात्रा दिधल्या । परी त्या सर्व फोल ठरल्या ॥ हेमगर्भाचा झाला गर्भपात । घात निर्भ्रांत । ठरलि तारिख तेविस मार्चाची । नातेवाईकास भेटण्याची ॥ सर्व नातेवाईक लोकांस । न्यावे भेटीस । हुकुम हा चीफ सेक्रेटरीचा । अधीकारी ऐकेना साचा ॥ जेल अधिकारी अक्कलवंत । ह्मणे न्यायवंत ???। भेटु आह्मी देणार इतर लोकां । भेट देईन फक्त जनानि जनका ॥ भेटण्यास

नाहीं येत साफ । ह्मणाती आई बाप । भेटु तर आह्मीं भेटु सगळे । नाहीं ह्मणताच वापस फिरले ॥ हुतात्मे भगतसिंगादि । होते आनंदी । ऑफिसर पुसति भगतसिंगा । अखेरचि इच्छा काय सांगा ॥ विरापरी मरण येण्याची । इच्छा आहे आमुची । गोळ्या घालुन आह्मा ठार करणें । वाटल्यास तोफेच्या तोंडी देणें ॥ किंवा याहीपेक्षां भयंकर । शिक्षा कुणि कठोर । असेल ती देवुन प्राण घ्यावे । चंडासम फाशि नच द्यावे ॥ मॅजिस्ट्रेट उत्तर ऐकुन । थक्क गेला होवुन । जज्ज थक्क झाला नवल काय । थक्क झाला असतां यमराय ॥ इच्छा पुरी करण्या हिंमत । नव्हती सरकारांत । रात्रि काढल बाहेर नयण्याला । २३ मार्च ३१ सालाला ॥

चाल—२३ मार्च ३१ साल लिहिले । भगतसिंगादि फाशी दिधले ॥
सतलूज नदिकांठीं देह नेले । कसे वसे पहाऱ्यात जाळियेले ॥
एक ध्येय त्यांचे आणि अपुले । परंतु मार्ग भिन्न पडले ॥
अत्याचारि होते ते सगळे । अनत्याचारी ब्रीद अपुले ॥

भगतसिंगासि फाशि देवुनी । नोकरशाहीनि । दुही करण्याचा व्युह रचिला । याचा परिणामि ग्रास झाला ॥ ३ ॥ जु० का०

किरण ४ थें.

अशा फासा नोकरशाहिनी । टाकला होता कसुनी । कॉंग्रेसची दुफळी करण्याचा परि तो नाहीं साधला साचा ॥ बुडत्याचे पाय खोलात । जाती ह्मणतात । त्यांचे दात त्यांचे घशांत पडले । उलट गोऱ्यांचे हृदय कळले ॥ ऑल इंडिया कॉंग्रेस । भरली कराचीस । प्रेसिडेंड वल्लभभाई की ने । पुढारी सर्व जमले होते ॥ किती तरी ठराव कांग्रेसचे । पास झाले साचे । समेटा बाबत ठराव आला । त्याचा मथितार्थ होता असला ॥ सरकार आणि कांग्रेस । त्यांच्या मधील खास । समेट जो गांधींनी केला । कांग्रेस मान्यता देते त्याला ॥ तंतोतंत समेटानुसार । वागल्या सरकार । तरिच गोलमेज-परिषदेला । कांग्रेस मग धाडिल गांधीला ॥ कांग्रेसचे ध्येय पूर्वीचे । ठरले जे साचे । मिळविणे पूर्ण स्वराज्यास । कायम आहे तेच ध्येय आज ॥ अशापरी अनेक महत्वाचे । ठराव झाले साचे । आखेर कांग्रेस पूर्ण

झाली । मार्च शेवटी ३१ साली ॥ लोटता थोडका काल । उलटला व्हाळ । गोरा गेला अपुल्या जातिवर की । दुध पिवुन साप गरळ टाकी ॥ समेट पाळित नाहीं सरकार । म्हणून चौफेर । उसळल्या वार्ता हिंदुस्थानी । काँग्रेसला कळविले लोकांनी ॥ अशा वार्ता येत कानावर । तेव्हां सत्वर । पत्र व्यवहार गांधी करिती । व्हाईसरायस लेखी क किती ॥ शेतसारा वसुल जुलमानी । करूनयें म्हणुनी । समेटात कलम पेशी असता । वायवा जुलमानी वसूल करता ॥ बेसुमार मार मारिती । स्त्रियांना छळती । पुरावे कितीतरी--मजपाशी । बघून हे दुःख होते मजसी ॥ अक्षेप माझे हे सत्य । किंवा असत्य । त्याची चौकशी करून पहावी । परोती कोर्टाकडून व्हावी । याचा निर्णाय लवकर सांगावा । सत्यन्याय व्हावा । याच्याविण गोल–मेज परिषदेला । जाणें अशक्य आहे मजला । गांधीच्या पत्रा उत्तर । देता सरकार । चौकशी पंचाकडून कांहीं । करविण्यास सरकार तयार नाहीं अह्मी वागतो आमच्या दृष्टीनी । पूर्ण न्यायानी । तुह्मी मध्यस्ती कोण करणार । मानित नाहीं काँग्रेसला सरकार । असले उत्तर धाडि खरडून । मिस्टर इमर्सन । वाचून हे गांधी थक्क झाले । लंडनला जाणें रहित केले ॥ गोलमेजासाठी जाणार । जमलेले सारे । गेले निघून इंग्लंडा कीं तें ॥ काँग्रेस तर्फेचे कुणी नव्हते ॥ ते कार्य यशस्वि न होई । काँग्रेस ज्यात नाहीं । समजा ते प्राणाविण शरिर । किंवा कुंकवाविण जैशी नार । चारपाशे गाड्या भरभरून । मोठ्या थाटान । लग्नाचे वऱ्हाडी जमले ते । फक्त नवरदेव नव्हता तेथे ॥ गोलमेजला यावी काँग्रेस । तिच्याविण खास । यशस्वी होणार नव्हता म्हणून । समेट केला होता सरकारान ॥ काय भाजे लॉर्ड इर्विनास । आली होती हौस । उपकार करण्याची काँग्रेसवर । म्हणुन का समेट केला थोर ॥ राजाकिय संस्था काँग्रेस । कबुल होते त्यांस मुष्किल झाले होते जगणे त्याला । अनुभव मागिल आठिव सगळा ॥ गांधी जात नाहींत लंडनला । गोल मेजाला । विद्युत वेगानें वार्ता असली । ऐकता जगनि खळबळ झाली ॥ चहुंकडुन नालस्ती साची झाली सरकारची । तेव्हां आगस्ट २५ ला । व्हॉइसराय

बोलावले गांधीला ॥ नविन व्हॉइसराय आले होवुन । लार्ड विलिंग्डन । बोले जणु साळुंकी साची । बोलाविताः धनी वेगळाची ॥ व्हॉइसराय बोले गांधीला । मिटवा तंट्याला । मंजुर काँग्रेसच्या अटी मजला । सिद्ध सभेट भंग चौकशीला ॥ आठवुनि काँग्रेसचा टोला । शुद्धिवर आला । आजचे मरण उद्यावर्ति गेले । नाहितर पांढरे झाले असते डोळे ॥ काँग्रेसनें टाकले ठरवून । जावे गांधीन । झाले हे वाईट किंवा बरवे । याचे मत सध्या नच कथवे ॥

चाल:-२९।८।३१ साला । गांधी गेले या दिनीं लंडनला ॥
काँग्रेस ती सांगत जनतेला । गोलमेजवरती न द्या डोळा ॥
दारु आणि परदेशी माला । बहिष्काराचा मारा टोला ॥
वाढवा काँग्रेस संघटनेला । विसरू नका राष्ट्रीय झेंड्याला ॥

टीप:-प्रार्थी गोपाळकृष्ण शाहीर । मिळवा यश थोर । स्मरुनिया सत्य ईश्वराला । मिळवावे पूर्ण स्वराज्याला ॥ ४ ॥ जु० का०

* * *

पुस्तक मिळण्याचा पत्ता—

शाहीर गोपाळ कृष्ण चोळकर, अकोला शहर.